# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडल, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १३९/२०११-१२/ दिनांक :

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. रविंद्र बाळा मगदूम,<br>रा. शाहूनगर, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली | अर्जदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडल कार्यालय, सांगली | विरुध्द पक्षकार |
| २) | कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, इस्लामपूर, जि. सांगली | |
| ३) | सहाय्यक अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, आष्टा, जि. सांगली | |

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. रविंद्र बाळा मगदूम, रा. शाहूनगर, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी आष्टा उप विभाग, इस्लामपूर विभाग, जि. सांगली यांचेविरुध्द तक्रार दि. ८.११.२०११ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

तक्रारदाराचे वडील कै. श्री. बाळा नाना मगदूम हे वहिवाटी हक्काने मौजे वाळवा येथील स.नं. ४८५/२ या जमिनीचे मालक आहेत. तक्रारदार यांच्या म्हणण्यानुसार श्री. विद्याधर बाळा मगदूम त्यांची मुले राजेंद्र विद्याधर मगदूम व जंबुकुमार बाळा मगदूम, अशोक बाळा मगदूम हे बाळा नाना मगदूम यांचे मृत्यूनंतर बेकायदेशीरपणे ही जमीन वहिवाटत आहेत. परंतु बाळा नाना मगदूम हे हयात असतांना त्यांनी इस्लामपूर येथील दिवाणी न्यायालयात रे.दि.मू. १५/२००२ चा ताकीदीचा दावा दाखल केला असून त्याचा निकाल अद्याप लागलेला नाही. शिवाय ५४९/९१, ३५३/९ हेही दावे वारस नोंदी संबंधी प्रलंबित आहेत. सदर जमीनी बाबत बाळा नाना मगदूम यांनी श्रीशैल रविंद्र मगदूम व राहूल रविंद्र मगदूम यांचे नांवे रजिस्टर्ड मृत्यूपत्र करुन दिलेले आहे. अर्जदार ग्राहकाने सर्व्हे नं. ४८५/२ मधील बोअरवर वीज कनेक्शन देऊ नये यासाठी मा. सहाय्यक अभियंता आष्टा व वि.प.च्या इस्लामपूर विभागीय कार्यालय यांना अनुक्रमे दि. २१.६.२०१० व २२.६.२०१० रोजी अर्ज दिला असून त्यासोबत मा. जिल्हाधिकारी यांचा निकाल व मा. कमिशनर, पुणे यांच्या निकालाची प्रत व मुंबई उच्च न्यायालयाची स्टेटसकोची ऑर्डर यांच्या झेरॉक्स प्रती सादर केलेल्या आहेत. तरीही वि.प.ने स.नं. ४८५/२ मध्ये बोअरसाठी नवीन वीज कनेक्शन दि. २१.३.२०११ रोजी दिलेले आहे. सदर अर्जासोबत दिलेले कागद बोगस आहेत. दि. ११.३.२०१० च्या ७/१२ वरुन संबंधित लोकांची नांवे कमी झालेली आहेत. ८ अ चा दि. २६.५.२०१० चा खाते उतारा व मेडीकल ऑफीसर, पी.एच.सी. वाळवा यांची सत्य प्रत म्हणून त्यावर सही घेतली आहे ही सर्व कागदपत्रे बोगस आहे तक्रारदाराचे म्हणणे आहे. कनेक्शन मंजुरीसाठी जो ७/१२ दिलेला आहे त्यावर जी तारीख आहे त्यामध्ये खाडाखोड दिसून येते आणि जलसिंचन प्रकार रकान्यामध्ये बोअर व्यवस्थापनाचा उल्लेख नाही. सातबारा व खाते उतारा एकाच तारखेचा नाही. दि. ७.११.२००९ चा गाव कामगार तलाठी यांनी दिलेला दाखल्यामध्ये खाडाखोड दिसते. तक्रारदाराने दि. १८.५.२०११ रोजी तक्रार अर्ज देऊन बोगस व बेकायदेशीर कागदपत्र दिल्याबद्दल संबंधितांची चौकशी व्हावी व कनेक्शन ताबडतोब बंद करावे व दोषी असणाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी केली आहे. त्यानंतर तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे दि. १८.५.२०११ रोजी तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाने दि. १२.७.२०११ ला आदेश देऊन कागदपत्रांच्या खरेखोटेपणा विषयी वकीलामार्फत खात्री करुन मंजुरी रद्द करणेविषयी निर्णय घ्यावा व पुढील योग्य त्या सूचना सहाय्यक अभियंता, आष्टा यांना द्याव्यात असे आदेश केले. अंतर्गत कक्षाच्या आदेशाविरुध्द तक्रारदाराने मंचाकडे दि. ८.११.२०११ रोजी अपील दाखल केले. त्या सोबत त्याच तारखेचा दि. ८.११.२०११ चा अर्ज अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, मंडल कार्यालय, कोल्हापूर यांचेकडे केला. त्यामध्ये अंतर्गत कक्षाचे आदेशाची माहिती झाल्यानंतर त्या आदेशानुसार पूर्तता करावी म्हणून अद्यापपर्यंत वाट पाहिली. मध्यंतरी स्मरणपत्रही पाठविले त्यामुळे अपील करण्यास विलंब झाला. सदर विलंब माफी असावी, अपील दाखल करुन घ्यावे, झालेली नुकसान भरपाई मिळावी व वीज कनेक्शन बंद करुन संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर कारवाई करावी अशी मागणी केली आहे.

वितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता, इस्लामपूर यांनी दि. २६.१२.२०११ च्या लेखी अहवालात श्री. राजेंद्र विद्याधर मगदूम यांनी दि. ८.६.२०१० रोजी मौजे वाळवा येथील गट क्र. ४८५/२ मध्ये ३ अश्वशक्ती वीज जोडणी मिळावी यासाठी ए वन फॉर्ममध्ये अर्ज केला.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

सदर अर्जासोबत दाखल केलेल्या ७/१२ उताऱ्यात श्री. राजेंद्र विद्याधर मगदूम यांचे वडील श्री. विद्याधर बाळा मगदूम यांचे नांव नोंद आहे. अंतर्गत कक्ष, सांगली यांचे आदेशानुसार इस्लामपूर विभागाच्या वतीने सहाय्यक अभियंता आष्टा यांनी सांगली येथील श्री. चिप्रे वकील यांच्याबरोबर सविस्तर चर्चा केली असतां, श्री. राजेंद्र विद्याधर मगदूम यांनी दाखल केलेली सर्व कागदपत्रे योग्य असल्याचे मत व्यक्त केले त्यामुळे सदर मंजुरी रद्द करणेबाबत कोणताही विचार करणेत आला नाही असे नमूद केले आहे.

प्रस्तुत तक्रारीची सुनावणी मंचासमोर दि. २७.१२.२०११ ला घेण्यात आली. तक्रारदार हजर. नोडल ऑफीसर श्री. क्षीरसागर, उप कार्यकारी अभियंता श्री. नेर्लेकर, कनिष्ठ अभियंता श्री. सपकाळ उपस्थित. तक्रारदार यांनी ते स्वत: मालक व सह-हिस्सेदार असतांना त्यांची संमत्ती घेतली नाही, वीज कनेक्शनसाठी बोगस कागदपत्रें जोडली आहेत, ७/१२ वर नांवे नसतांना वीज जोडणी दिली आहे. महसुल अधिकाऱ्यांचा निर्णय / आदेश म्हणण्यापुष्ट्यर्थ जोडले आहेत. जमिनीच्या मालकीहक्काबाबत दिवाणी स्वरुपाचे दावे प्रलंबित आहेत. तसेच मा. मुंबई उच्च न्यायालयाने स्टेटसकोचे आदेश दिले आहेत, तरी वीज जोडणी दिली आहे असे तक्रारदाराने नमूद केले आहे. अर्जदाराने वडिलांचे संमत्तीपत्र घेतले आहे, परंतु सह-हिस्सेदारांची संमत्ती घेतली नाही. तक्रारदाराचे पुतण्याचे नांवे मृत्यूपत्र आहे, त्यामुळे सदरचे वीज कनेक्शन बंद करण्याचे आदेश व्हावेत अशी मागणी ग्राहकाने केली. वि.प.चे अधिकारी श्री. नेर्लेकर, उप कार्यकारी अभियंता यांनी प्रतिपादन केले की, कागदपत्रांचा खरेखोटेपणा वि.प. सांगू शकत नाही, दि. २६.५.२०१० च्या उताऱ्यात नोंद आहे, गावकामगार तलाठी यांचे प्रमाणपत्र दिले आहे , कागदपत्रे बोगस नाहीत, दिलेली मंजुरी व वीज जोडणी योग्य आहे.

खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) तक्रारदार ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे वि.प.चे उप विभागीय अधिकारी, आष्टा यांनी दिलेली बोअरवेल वीज जोडणी क्र. ६२४६०६६६६६६१ बंद करण्याचे आदेश वि.प.स देणे योग्य होईल काय ?

उत्तर : होय

२) मंचाकडे दाखल केलेले गाऱ्हाणे मुदतीत आहे काय ?

उत्तर : होय

आदेश ?

खालील प्रमाणे

## कारणमिमांसा

उभयबाजूंच्या कथनानुसार सर्व्हे नं. ४८५/२ ही जमीन ग्राहकाचे वडील कै. श्री. बाळा नाना मगदूम यांचे नांवे आहे. बाळा नाना मगदूम यांनी तक्रारदार ग्राहकाची मुले यांच्या हक्कात रजिस्टर्ड मृत्यूपत्र दि. ११.६.२००२ रोजी केलेले दिसते. मृत्यूपत्रातील मिळकत क्र. ४८५/२ यामध्ये वादग्रस्त बोअर कनेक्शन आहे. तक्रारदार यांच्या म्हणण्यानुसार श्री. विद्याधर बाळा मगदूम त्यांचा मुलगा राजेंद्र व जंबुकुमार बाळा मगदूम, अशोक बाळा मगदूम हे बाळा नाना मगदूम यांचे मृत्यूनंतर बेकायदेशीरपणे ही जमीन वहिवाटत आहेत.

This document was created using Smart PDF Creator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

परंतु बाळा नाना मगदूम हे हयात असतांना त्यांनी इस्लामपूर येथील दिवाणी न्यायालयात रे.दि.मू. १५/२००२ चा ताकीदीचा दावा दाखल केला आहे. त्यामध्ये प्रतिवादी श्री. विद्याधर बाळा मगदूम वगैरे आहेत. दि. १३.३.२००२ रोजी वरिष्ठस्तर न्यायालय, इस्लामपूर यांनी प्रतिवादी १ ते ४ यांना प्रस्तुत केसमध्ये संमत्तीपत्र देण्यास विद्याधर व त्यांचे इतर भाऊ आणि मुलगा यांना आधीच्या वहीवाटीस हरकत घेऊ नये असा मनाई आदेश दिलेला आहे. सदरचा आदेश मा. उच्च न्यायालयात रिट पिटीशन क्र. ८२४३/२००३ द्वारे आव्हान दिले असल्याने त्यामध्ये दि. २९.११.२००५ रोजी स्टेटसकोचे आदेश ३ वर्षापासून चालू असल्याने ते दाव्याचा निकाल होईपर्यंत राहतील असे आदेश दिले आहेत. इतर दोन दावे श्री. बाळा मगदूम यांच्या वारसामध्ये आहेत.

तक्रारदार यांनी दि. २१.६.२०१० रोजी सहाय्यक अभियंता, आष्टा, कार्यकारी अभियंता, इस्लामपूर यांना लेखी कळवूनही कनेक्शन दिले आहे. क्षणभर कागपत्रे बोगस असल्याचे तक्रारदाराचे म्हणणे दूर्लक्ष करुन किंवा बाजूला ठेवले तरी, तक्रारदार यांची सदरच्या वीज जोडणीस संमत्ती नव्हती त्याबद्दल वि.प.ने कुठलीही खात्री केलेली नाही व श्री. विद्याधर बाळा मगदूम यांचा मुलगा राजेंद्र यांचे नांवे कनेक्शन दिले आहे. वि.प.चे अधिकारी श्री. नेर्लेकर यांनी मंचासमोर दिवाणी न्यायालयाचे आदेश किंवा मा. उच्च न्यायालयाचे आदेशाबाबत ग्राहकाने कांहीही सांगितले नाही असे सांगण्याचा प्रयत्न केला. अर्जदार ग्राहकाने सर्व्हे नं. ४८५/२ मधील बोअरवर वीज कनेक्शन देऊ नये यासाठी मा. सहाय्यक अभियंता आष्टा दि. २१.६.२०१० रोजी अर्ज दिला असून त्यासोबत मा. जिल्हाधिकारी यांचा निकाल व मा. कमिशनर, पुणे यांच्या निकालाची प्रत व मुंबई उच्च न्यायालयाची स्टेटसकोची ऑर्डर यांच्या झेरॉक्स प्रती सादर केलेल्या आहेत. त्यामुळे वि.प.चे अधिकारी श्री. नेर्लेकर यांचे म्हणणे तक्रारदार ग्राहकाने दिवाणी न्यायालयाचे आदेश किंवा मा. उच्च न्यायालयाचे आदेशाबाबत कांहीही सांगितले नाही, हे ग्राह्य धरता येणार नाही. या उलट, वि.प.ने जवळ जवळ ९ महिन्यानंतर मार्च २०११ मध्ये वीज जोडणी दिली आहे. या मधल्या काळात तक्रारदार ग्राहकाला नोटीस देऊन प्रथम संमत्ती घेण्याबाबत विचार करणे जरुर होते. तक्रारदाराच्या जमिनीबाबत न्यायालयात दावे प्रलंबित असल्याने वीज जोडणी देता येते किंवा नाही याबद्दल वि.प.ने आपल्या वकिलाकडून खुलासा करुन घेणे आवश्यक होते, परंतु प्रस्तुत प्रकरणी अशी कुठलीही खात्री न करता वि.प.ने वीज जोडणी दिलेली आहे. त्यामुळे कागदपत्रे बोगस आहेत किंवा नाहीत हे पहाण्याचे अधिकार वि.प.ला नाहीत हे म्हणणे फोल ठरते. अर्जदाराने महसुल खात्यामार्फत फेरफार व नोंदीबाबत प्रोसिडींग चालू आहे. ७/१२ वर नोंद झाली आहे, पाण्याचे स्त्रोत अर्ज केला त्यामध्ये नोंद नाही, ग्राहकाचे बोअरबाबतचा तपशील तक्रारीत आला असतां कारण २००२ च्या दाव्यामध्ये दिवाणी न्यायालयाचे आदेश फार पूर्वीच मार्च २००२ पासून अस्तित्वात आहेत. त्यामुळे वादातील वीज जोडणी ही ग्राहकाच्या संमत्तीविना व दिवाणी न्यायालयाचे आदेश डावलून, दूर्लक्ष करुन किंवा त्याची माहिती न घेता दिलेले आहे. यामुळे दिवाणी न्यायालयाचे आदेशा विरुध्द वीज जोडणी घेणाऱ्या शेत मालकाने त्या संबंधी वि.प.चे समाधान करणे आवश्यक होते. तक्रारदारांची हरकत असतांनाही श्री. विद्याधर बाळा मगदूम यांनी आपल्या मुलाचे नांवे, तक्रारदार यांची संमत्ती न घेता, ७/१२ वर पाण्याचे स्त्रोत नोंदी असल्याचे दाखवून वीज जोडणी घेतली आहे. अशा प्रकारची वीज जोडणी निश्चितपणे कायदेशीर नाही, नियमाला धरुन नाही. त्यामुळे तक्रारदार ग्राहकाने मागणी केलेली ही वीज जोडणी बंद करणे आवश्यक आहे. ग्राहकाची मागणी मंजूर करण्यात येत आहे . मुद्दा क्र. १चे होय असे देण्यात येत आहे.

This document was created using Smart PDF Creator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००६ मधील कलम ६.४ नुसार ग्राहकाचे अंतर्गत कक्षाचे आदेशाने समाधान न झालेस आदेश पारीत झालेल्या तारखेपासून २ महिने मुदतीत किंवा २ महिने मुदतीत कुठलेही आदेश न झालेस ग्राहक मंचाकडे गाऱ्हाणे दाखल करु शकतो. या २ महिन्याच्या काळात वितरण कंपनी ग्राहकाला अंतर्गत कक्षाच्या आदेशानुसार काय कार्यवाही झाली हे लेखी कळवू शकते. ग्राहकाने आपल्या अर्जात अंतर्गत कक्षाचे आदेशानुसार काय कार्यवाही होते याची वाट पाहिली व त्यानंतर दि. ८.११.२०११ रोजी मंचाकडे गाऱ्हाणे दाखल केले. ग्राहकाच्या इतर मागण्या प्रामुख्याने परिशिष्ट अ मधील कॉलम ८ मध्ये नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे. यामध्ये ग्राहक मंचाचे समाधान करु शकले नाही. कायद्यानुसार संमत्तीविना वीज पुरवठा दिला म्हणून भरपाई द्यावी अशी तरतूद नाही, त्यामुळे भरपाईची मागणी कायद्यात बसत नसल्याने फेटाळण्यात येत आहे. खालील प्रमाणे आदेश -

## आदेश

१) तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत आहे.
२) श्री. रविंद्र बाळा मगदूम यांचे बोअरवेल वीज जोडणी क्र. ६२४६०६६६६६६१ बंद करण्याची मागणी मंजूर करण्यात येत आहे.
३) तक्रारदार ग्राहकाची भरपाईची मागणी फेटाळण्यात येत आहे.
४) वितरण कंपनीचे सहाय्यक अभियंता, आष्टा उप विभाग व कार्यकारी अभियंता, इस्लामपूर यांनी मौजे वाळवा येथील गट क्र. ४८५/२ मधील वादग्रस्त बोअरवेल वीज जोडणी हा आदेश प्राप्त झाल्यापासून ३ महिन्यात बंद करुन तसा अहवाल मंचास द्यावा.
५) ग्राहकाची मागणी वि.प.च्या अधिकाऱ्यावर कारवाई करावी ही फेटाळण्यात येत आहे.
६) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.
७) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे-पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक :

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using Smart PDF Creator To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com